3/9/87

शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती (महाराष्ट्र)

५४, बुधवार पेठ, पुणे २.

दिनांक ३-९-१९८७

आनंद सरदार

स.न.

१८-८-१९८७ रोजी पुणे येथे झालेल्या समन्वय समितीच्या बैठकीचा वृत्तांत यापूर्वीच आपणाकडे पाठविला आहे.

१. शेतमजूर किमान वेतन समितीच्या कामकाजावर बहिष्कार घालणे.

२. किमान वेतन समिती कायदयाप्रमाणे पुर्नगठीत करून त्या समिती शास्त्राशुध्द निकषाच्या आधारे वेतनदर ठरवून ते महागाई-निर्देशांकाशी जोडावेत म्हणून रिट अर्ज हायकोर्टात दाखल करणे.

३. किमान वेतनात १०० % वाढ करावीम्हणून राज्यव्यापी आंदोलनाची तयारी करावी. त्यासाठी मेळावे बैठका महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात संघटीत कराव्यात.

४. १५ ऑक्टोबर १९८७ रोजी पुणे येथे महाराष्ट्र व्यापी परिषद संघटीत करून किमान वेतनाबरोबरच गायरान जमिनीचा प्रश्न, आदिवासी, दलित, शेतमजूरांवर होणारे वाढते हल्ले, अतिक्रमीत जमिनीचे पटयाचे प्रश्न व रोजगार हमी वर मागेल त्याला काम आदी सर्व प्रश्न धसास लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

५. शेतमजूरांच्या किमान वेतनाच्या प्रश्न हा एकंदर कामगार चळवळीच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने केंद्रीय कामगार संघटनांच्या संयुक्त कृति समितीच्या नेत्यांना भेटून त्यांचा सहभाग व सहकार्य घेणे.

वरील प्रमाणे निर्णय झाले आहेत. या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्रात ठिकठिकाणी तालुका मेळावे, बैठका, सभा सुरु झाल्या असून बैठकीला ठरलेल्या ठिकाणी प्रचारही सुरु करण्यात झाला आहे. संयुक्त कृती समितीच्या नेत्यांशीही दिनांक २६ ऑगस्ट रोजी बा.न.राजहंस , कॉ. . चव्हाण, भास्कर जाधव आदी मंडळींनी चर्चा केली आहे. सयुंक्त कृती समितीच्या नेत्यांनीही आपला पूर्ण पाठींबा व ताकद शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समितीच्या मागे उभी करण्याचे आवश्वासन दिले आहे.

१५ ऑक्टोबर १९८७ परिषद" ही महत्वपूर्ण अशी होण्याचे दृष्टीने महाराष्ट्रभर तयारी करावी लागणार आहे. या परिषदेसाठी उदघाटक, प्रमुख पाहुणे म्हणून दयावयाची निमंत्रणे व त्याचे नावे निश्चीत करणे, परिषदेच्या ठरावाचे मसुदे तयार करणे, परिषदेच्या खर्चाची तयारी करणे, परिषदेच्या अनुषंगाने करावयाची इतर तयारी या दृष्टीने एक महत्वपूर्ण बैठक पुणे येथे दिनांक १९ सप्टेंबर १९८७ रोजी सकाळी ११ वाजता काकाकुवा, मॅन्शन लक्ष्मी रोड, पुणे ४११००२ ( फोन नं. ४४ ५२ ६० ) पुणे ४११००२ या ठिकाणी आयोजित केली आहे. सदर बैठकीस आपण हजर रहावे ही विनंती.

आपण येत असल्याचे कृपया त्वरीत पत्र देवून कळविल्यास सोयीचे होईल.

कळावे.

आपले,

बा. न. राजहंस

संतराम पाटील

निमंत्रक

शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती (महाराष्ट्र)